दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २७४/२०२५
कल्याण नामदेव भुजंग
**विरुध्द** मंदा विनायक गाडेकर व इतर
नि.क्र.११

**<u>पडताळणी</u>**

**माझे नाव –** कल्याण नामदेव भुजंग
**वय**- ५४ वर्षे धंदा शेती व मजुरी
**रा. रामराई** ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

असे असुन शपथपत्रातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

**श्रवणोत्तर स्वीकृत**

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2026.03.23 15:07:03 -0100

रोहीत नं. पाठक

दिनांकः- १६.०२.२०२६

सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गंगापूर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २७४/२०२५
कल्याण नामदेव भुजंग
**विरुध्द** मंदा विनायक गाडेकर व इतर
नि.क्र.११

**<u>पुढील सरतपास अर्जदारा तर्फे विद्यीज्ञ ए.एस.बर्वे शपथेवर सुरु</u>**

मी पुराव्याच्या शपथपत्रासोबत मा. दिवाणी न्यायालय व.स्तर वैजापुर येथील दिवाणी क्रि. क्र.४०/२०१६ ची अधिकृत संकेत स्थळावरुन काढलेलया न्यायनिर्णयाची प्रत दाखल केली आहे. सदर प्रतिस नि.क्र.१४ देण्यात येत आहे.

**श्रवणोत्तर स्विकृत**

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2026.03.23 15:07:09 -0100

रोहीत नं. पाठक

दिनांकः- १२.०३.२०२६

**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**गंगापूर**

**<u>उलटतपास अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री पी.बी.जोशी-</u>**

हे म्हणणे खरे आहे की, वैजापुर न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी जो अर्ज दाखल केला होता त्यात केवळ मी एकटा अर्जदार होतो. सदर प्रकरण मी सन २०१६ साली दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अर्ज दाखल करते वेळेस सामनेवाला क्र. २ ते ६ हे माझ्यासोबत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अर्ज मी महाराष्ट्र शासन, मंदाबाई, शांताबाई, अशोक, सुमनबाई व लताबाई यांच्याविरुध्द दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यात व उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे मंदाबाई व इतर यांच्यात सन २०११ पासुन वाद चालु आहेत. हे म्हणणे खरे आहे की, या वादाच्या अनुषंगाने आम्ही एकमेकाविरुध्द गंगापुर न्यायालयात अनेक दिवाणी प्रकरणे दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, एकमेकांविरुध्द फौजदारी प्रकरणे देखील दाखल झाली होती. हे मला सांगता येणार नाही की, माझ्या वडीलांनी जी जमीन विक्री केली त्याबददल व त्याच्याकडे असलेल्या पैशाबददल प्रकरणे चालु आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी प्रकरणात माझा व कडुबा किसन भुजंग यांचा जबाब नोंदवण्यात आला

आहे. कडुबा भुंजग हे आजही माझ्यासोबत न्यायालयात आलेले आहेत. कडुबा भुंजग व माझे चांगले संबंध आहेत.

**०२.** माझी आई अशिक्षीत होती. लक्ष्मण भिकाजी गायकवाड हे माझे पाहुणे आहेत. ते तहसील कार्यालयात काम करत होते. लक्ष्मण गायकवाड व माझे चांगले संबंध होते. प्रकाश सिताराम पाटील हे माझे आठ ते दहा वर्षापासुनचे चांगले मित्र आहेत. प्रकाश पाटील आज न्यायालयात आलेले आहेत.

**वकीलांच्या तोंडी विनंती वरुन पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2026.03.23 15:07:16 -0100

रोहीत नं. पाठक

दिनांकः- १२.०३.२०२६

सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गंगापूर